# सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय,

**शासकीय तंत्र निकेतन परिसर, गाडगे नगर, अमरावती ४४४ ६०३**

E-mail:-roamravati.dte@gmail.com Ph.No. :(०७२१) २५७३०२७, २५७२५७७

Website: www.jdroamt.org Fax No. : (०७२१) २५७ ७९९३

क्रमांक :- विकाअ/शिक्षण/एफसी/२०१६/2596

दिनांक :- 29/7/2016

**प्रति,**

**प्राचार्य,**

सर्व पदवीका, पदवी तसेच पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाचे,

सुविधा केंद्र (Facillitation Centre)

अमरावती विभाग, अमरावती.

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०१६-१७ करीता सर्व व्यावसायीक पदवीका, पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेदरम्यान सुविधा केंद्र (Facillitation Centre) यांचेकडे जमा असलेल्या रोख रकमेबाबत.**

**संदर्भ :-** मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे पत्र क्रमांक :-२अ/एडीएम/धनाकर्ष/२०१६/८८७ दि. ११ जुलै २०१६.

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१६-१७ करीता सर्व व्यावसायिक पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशप्रक्रियेकरीता आपल्या संस्थेचे सुविधा केन्द्र (Facilitation Centre) म्हणुन निश्चित करण्यात आलेले आहेत. प्रवेश प्रक्रियेदरम्यान विद्यार्थ्याने सुविधा केन्द्राकडे अर्ज विक्री व Category Conversion करीता आकारण्यात आलेल्या शुल्काची रोख रक्कम आपणाकडे जमा करण्यात आलेली आहे. सदर रोख रक्कम जमा करण्यासंदर्भात खालीलप्रमाणे आपणास सूचना देण्यात येत आहेत.

**१)** आपल्या सुविधा केन्द्राकडे अभ्यासक्रमनिहाय जमा रोख रकमेचा Commissioner, State CET Cell, Maharashtra State यांचे नावे Payable at Mumbai असलेला धनाकर्ष या कार्यालयास जमा करावा.

**२)** धनाकर्षाची मुदत तीन महिने असल्यामुळे धनाकर्ष मुदतबाहय होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

**३)** Category Conversion संदर्भात केन्द्राकडे जमा असलेली रक्कम केन्द्राला देय मानधनामधून समायोजित करण्यात येणार असल्यामुळे त्याबाबतचे आदेश स्वतंत्ररित्या निर्गमीत करण्यात येतील.

तसेच आपणास कळविण्यात येते की, वरील सुचनांचे काटेकोरपणे पालन करुन हिशोब या कार्यालयास सादर करावा.

प्र.सहसंचालक तंत्रशिक्षण,

अमरावती.

**प्रत :- प्रोग्रामर,** तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्यासाठी.